**प्रेसनोट** दिनांक २१/०७/२०२५

**पोलीस शहर पोलीस ठाणे, नवी मुंबई येथील पोलीस उप निरीक्षक (वर्ग–२) यास लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंध रायगड विभागाने घेतले ताब्यात.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंध विभाग | रायगड. |
| ठाणे दैनंदिनी नोंद क्रमांक | पनवेल शहर पोलीस ठाणे, दैनंदिनी नोंद क्र.०५/२०२५, दि.२२/०७/२०२५ वेळ ०२-२२ वाजता. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | लोकसेवक श्री.सचिन वामन वाईकर, पोलीस उप निरीक्षक, पनवेल शहर पोलीस ठाणे(वर्ग-२) |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | १,००,०००/- रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | तडजोडअंती ५०,०००/- रूपये |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांचे वडिलांचे विरूध्द पनवेल शहर पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्हयामध्ये कलम वाढ करून, तक्रारदार यांचे वडिलांचा अंतरिम जामिन नामंजूर करून त्यांना अटक करेन अशी भिती घालत असलेबाबत व अटक न करणेकरीता लोकसेवक श्री.सचिन वामन वाईकर, पोलीस उप निरीक्षक, पनवेल शहर पोलीस ठाणे हे १,००,०००/- रूपयांची मागणी करीत असलेबाबत दिनांक २१/०७/२०२५ रोजी तक्रार प्राप्त झाली होती.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तकारीच्या अनुषंगाने पडताळणीच्या वेळी दि.२१/०७/२०२५ रोजी १४-२३ ते १५-२१ वा.चे दरम्यान लोकसेवक श्री.सचिन वामन वाईकर यांनी पंचासमक्ष एमएसईबी कार्यालयासमोर, उरण नाका, पनवेल येथे तक्रारदार यांचेकडे रू.१,००,०००/- लाचेची मागणी करून, तडजोडीअंती ५०,०००/- रूपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले आहे.<br>त्यानुसार दिनांक २१/०७/२०२५ रोजी श्री मारूती कुशन, शिवाजी चौक, जुना पनवेल येथे सापळा आयोजित केला असता, लोकसेवक श्री.सचिन वामन वाईकर, पोलीस उप निरीक्षक, पनवेल शहर पोलीस ठाणे यांनी मागणी केल्याप्रमाणे लाचेची रक्कम रू.५०,०००/- लोकसेवक श्री. सचिन वाईकर यांनी त्यांचे व्हॅगन-आर कारमध्ये खाजगी इसम श्री.रविंद्र उर्फ सचिन सुभाष बुट्टे, वय-३० वर्षे, रा.करंजाडी, सेकट-१, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांचेमार्फत स्वीकारल्याने दिनांक २१/०७/२०२५ रोजी २२-३० वा. लोकसेवक श्री.सचिन वाईकर व खाजगी इसम श्री.रविंद्र बुट्टे यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. आरोपी लोकसेवक यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरू आहे. |
| मार्गदर्शक अधिकारी | १) मा.श्री.शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे<br>२) मा.श्री.संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे<br>३) मा.श्री.सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे |
| पर्यवेक्षक अधिकारी | श्रीमती सरिता भोसले, पोलीस उप अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, रायगड, अलिबाग |
| सापळा व तपासी अधिकारी | श्री. निशांत धनवडे, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, रायगड, अलिबाग |
| सापळा पथक | १) श्रीमती सरिता भोसले, पोलीस उप अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, रायगड, अलिबाग<br>२). निशांत धनवडे, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, रायगड-अलिबाग<br>३) श्री. विनोद जाधव, सहा. फौजदार, ॲन्टी करप्शन ब्युरो, रायगड-अलिबाग<br>४) श्री. महेश पाटील, पो.ह./२१८०, ॲन्टी करप्शन ब्युरो, रायगड-अलिबाग<br>५) श्री. नवदीत नांदगांवकर, पोशि/२३३५, ॲन्टी करप्शन ब्युरो, रायगड-अलिबाग |

लाचलूचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना अवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती अगर लाच मागणा–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– ला.प्र.वि.ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर ठाणे (प) ४०० ०६१.
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईनतक्रारॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री कमांक :– १०६४
दुरध्वनी कमांक :– ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉट्सॲप कमांक :– ९९३०९९७७००
ॲन्टी करप्शन ब्युरो, रायगड अलिबाग कार्यालय दुरध्वनी कमांक ०२१४१ – २२२३३१
मोबाईल क्र. :– ९००४३७४९१० ( सरिता भोसले ), ८१०८३५५४८८ ( निशांत धनवडे), ७९७७११६२३१( नारायण सरोदे )
ईमेलआयडी :– dyspacbraigad@gmail.com

पोलीस उप अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो रायगड, अलिबाग

**(सरिता आय. एस. भोसले)**
**पोलीस उप अधीक्षक,**
**ॲन्टी करप्शन ब्युरो, रायगड–अलिबाग**